# ७. विंचू चावला...

भाग – २

■ **संत एकनाथ** (१५३३ ते १५९९) :

श्रेष्ठ संतकवी. संत एकनाथ महाराज यांनी 'चतु:श्लोकी भागवत' हा पहिला ग्रंथ रचला. 'रुक्मिणी स्वयंवर' हे आख्यानकाव्य लिहिले. 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथाची पाठशुद्ध प्रत तयार केली. वारकरी संप्रदायाचे तत्वज्ञान आणि आचारधर्म यांचा मानवतावादी भूमिकेतून सातत्याने प्रसार केला. जोहार, गौळणी, आरत्या, अभंग, भारुडे यांसारख्या काव्यरचनेतून लोकशिक्षणाचे कार्य प्रभावीपणे केले. जातीपातीचा भेद न मानता सर्वसामान्यांना आपल्या कार्यात सामावून घेतले.


'भारूड' हा काव्यप्रकार संत ज्ञानेश्वर महाराज यांनी प्रथम आणला; संत एकनाथ महाराज यांनी तो विशेष लोकप्रिय केला. त्यांनी अतिशय सुगम व चटकन आकर्षित करून घेतील अशी भारुडे रचली. त्यामुळे 'भारूड' म्हटले की 'एकनाथ महाराज' असा ठसा जनमानसात उमटला. 'भारूड' हे 'आध्यात्मिक रूपक' असते. सर्वसामान्य जनतेला पारमार्थिक नीतीची शिकवण द्यावी, हा त्यामागील उद्‌देश असतो. संत एकनाथ महाराज यांनी त्यांच्या भारुडांतून सांसारिकांना परिचित अशा रूपकांचा वापर करून शिकवण दिली. एकनाथी भारुडांची रचना विलक्षण नाट्यपूर्ण आणि चटकन पकड घेणारी आहे. संत एकनाथ महाराज यांनी जवळपास तीनशे भारुडे रचली. त्यांची काही भारुडे हिंदीतही आहेत.

'विंचू चावला' हे संत एकनाथ महाराज यांचे सुप्रसिद्‌ध आणि नाट्यमय भारूड आहे. या भारुडातील 'विंचू' हे 'काम' आणि 'क्रोध' या विकारांचे प्रतीक आहे. काम म्हणजे इच्छा आणि क्रोध म्हणजे राग, संताप. अनिर्बंध इच्छा आणि क्रोध यामुळे माणसाचे जीवन दूषित होते. कामक्रोधाची बाधा झाली, की माणूस विंचू चावल्याप्रमाणे बेताल वागू लागतो. विंचवाच्या चावण्यामुळे माणसाच्या शरीरात विष भिनून त्याला असह्य वेदना होतात, तसे काम आणि क्रोधाच्या बाधेमुळेसुद्‌धा मानवी जीवन अविचारी होते. त्यावर उपाय म्हणजे कामक्रोधांनी बाधित झाल्यावर सत्वगुणांचा आश्रय घ्यावा. संत एकनाथ महाराज यांनी आपल्या भारुडांमधून अंधश्रद्‌धेवर कोरडे ओढले आहेत. इथे सुद्‌धा अंगारेधुपारे या अंधश्रद्‌धेवर प्रहार केलेला आहे. अंगाराच लावायचा असेल, तर तो सत्वगुणांचा लावा, म्हणजे सद्‌गुणांचा अंगीकार करा. मग दुर्गुण जाऊन सद्‌गुणांचा विकास होईल आणि समाधान लाभेल, असा मोलाचा उपदेश संत एकनाथ महाराज यांनी या भारुडातून केला आहे.

**विंचू चावला वृश्चिक चावला ।**
**कामक्रोध विंचू चावला ।**
**तम घाम अंगासी आला ।।धृ.।।**

**पंचप्राण व्याकुळ झाला ।**
**त्याने माझा प्राण चालिला ।**
**सर्वांगाचा दाह झाला ।।१।।**

**मनुष्य इंगळी अति दारुण ।**
**मज नांगा मारिला तिनें ।**
**सर्वांगी वेदना जाण ।**
**त्या इंगळीची ।।२।।**



ह्या विंचवाला उतारा ।
तमोगुण मागें सारा ।
सत्त्वगुण लावा अंगारा ।
विंचू इंगळी उतरे झरझरां ।।३।।

सत्त्व उतारा देऊन ।
अवघा सारिला तमोगुण ।
किंचित् राहिली फुणफुण ।
शांत केली जनार्दनें ।।४।।

(श्रीसकलसंतगाथा खंड दुसरा, संपादक-प्रा. डॉ. र. रा. गोसावी)

## कृती

**(१) (अ) योग्य पर्याय निवडा व विधान पूर्ण करा.**

**(१) तम घाम अंगासी आला, म्हणजे...**

(अ) संपूर्ण शरीराला घाम आला.
(आ) घामाने असह्यता आली.
(इ) घामामुळे मन अस्थिर झाले.
(ई) शीघ्रकोपी वृत्ती वाढीस लागली.

**(२) मनुष्य इंगळी अति दारुण, म्हणजे-**

(अ) माणसातील विकाररूपी इंगळी अतिशय भयंकर असते.
(आ) मनुष्याला इंगळी चावणे वाईट.
(इ) इंगळी मनुष्याचा दारुण पराभव करते.
(ई) मनुष्याला इंगळी नांगा मारते.

**(३) सत्त्व उतारा देऊन, म्हणजे-**

(अ) जीवनसत्त्व देऊन.
(आ) सत्त्वगुणांचा आश्रय घेऊन.
(इ) सात्त्विक आहार देऊन.
(ई) सत्त्वाचे महत्त्व सांगून.

**(४) 'विंचू चावला वृश्चिक चावला', शब्दांच्या या द्विरुक्तीमुळे-**

(अ) भारूड उत्तम गाता येते.
(आ) वेदनांचा असह्यपणा तीव्रतेने जाणवतो.
(इ) भारुडाला अर्थ प्राप्त होतो.
(ई) भारूड अधिक रंजक बनते.

**(आ) कृती करा.**

**कामक्रोधरूपी विंचू-इंगळी उतरवण्याचे उपाय**

(इ) **खालील शब्दांचे अर्थ लिहा.**

(१) वृश्चिक ............

(२) दाह ............

(३) क्रोध ............

(४) दारुण ............

**(२) खालील ओळींचा अर्थ लिहा.**

ह्या विंचवाला उतारा । तमोगुण मागें सारा ।
सत्त्वगुण लावा अंगारा । विंचू इंगळी उतरे झरझरां ।।

**(३) काव्यसौंदर्य.**

सत्त्व उतारा देऊन ।
अवघा सारिला तमोगुण ।
किंचित् राहिली फुणफुण ।
शांत केली जनार्दनें ।।४।।

वरील ओळींतील भावसौंदर्य स्पष्ट करा.

**(४) रसग्रहण.**

**खालील ओळींचे रसग्रहण करा.**

विंचू चावला वृश्चिक चावला ।
कामक्रोध विंचू चावला ।
तम घाम अंगासी आला ।।धृ.।।

पंचप्राण व्याकुळ झाला ।
त्याने माझा प्राण चालिला ।
सर्वांगाचा दाह झाला ।।१।।

मनुष्य इंगळी अति दारुण ।
मज नांगा मारिला तिनें ।
सर्वांगी वेदना जाण ।
त्या इंगळीची ।।२।।

**(५) अभिव्यक्ती.**

(अ) तुमच्यातील दुर्गुणांचा शोध घ्या. हे दुर्गुण कमी करून सद्‌गुण अंगी बाणवण्यासाठी तुम्ही काय कराल ते लिहा.

(आ) 'दुर्जनांची संगत इंगळीच्या दंशाइतकी दाहक आहे, त्यावर सत्संग हा सर्व दाह शांत करणारा उपाय आहे', स्पष्ट करा.

**उपक्रम :**

संत एकनाथ महाराज यांची इतर भारुडे मिळवून वाचा.

- **तोंडी परीक्षा.**

  **'विंचू चावला' हे भारूड सादर करा.**

❀❀❀